**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकरीता बिलिंग सॉफ्टवेअर सुरु करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : मावज-२०२६/प्र.क्र.५५/मावज-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ एप्रिल, २०२६.

<u>वाचा</u> :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.नवमाध्यम २०२६ /बिलिंग सॉफ्टवेअर /का-८/२६५, दि.१६.०३.२०२६ चे पत्र.

**<u>प्रस्तावना</u> :-**

शासनाच्या विविध विभागांच्या योजना, उपक्रम, अभियान यांची माध्यम आराखड्याच्या माध्यमातून प्रभावीपणे प्रचार प्रसिद्धी करण्याचे महत्त्वपूर्ण काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात येते. माध्यम आराखड्याअंतर्गत वित्तीय देकार मागवून संबंधित कामांसाठी संस्थेची नियुक्ती करण्यात येते. तसेच, सूचीबद्ध एकाधिकार प्राप्त संस्थांना महासंचालनालयामार्फत सीबीसी दराने थेट कार्यादेश देण्यात येतात. कामाच्या पूर्ततेनंतर संबंधित संस्थांकडून देयके सादर केली जातात. देयक सादर करणे, देयकाशी संबंधित अहवाल, होर्डिंग लावल्याबाबतची छायाचित्रे उपलब्ध करणे आणि इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर करणे, त्यांची छाननी करणे आणि अंतिमतः देयक मंजुरीसाठी सादर करणे या प्रक्रियेत अनेकदा कालापव्यय होतो. या पार्श्वभूमीवर सदर प्रक्रिया सुटसुटीत करण्यासह त्याचा कालावधी कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन केंद्रीकृत प्रणाली तयार करुन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या गरजेप्रमाणे बिलिंग सॉफ्टवेअर (देयक व्यवस्थापन प्रणाली) विकसित करण्यासाठी येणा-या अंदाजित रु. ६ लक्ष (अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

संदर्भाधिन दिनांक १६.०३.२०२६ च्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयासाठी बिलिंग सॉफ्टवेअर विकसीत करण्यासाठी येणा-या अंदाजित रु. ६ लक्ष (अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावित खर्च करतांना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सामान्य प्रशासन विभाग माहिती व तंत्रज्ञान विभागाचे शासन निर्णय व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.१/१२/२०१६ व तद्नंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

२.	प्रस्तुतचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्रमांक-ए-०६, २२२०, माहिती व प्रसिद्धी-०१ चित्रपट-००१ संचालन व प्रशासन (००) (०१) प्रसिद्धी संचालक (अनिवार्य), १७-संगणक खर्च (संगणक संकेतांक २२२०००४३) या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३.	वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.२७-अ, नियम क्र. ७६ नुसार नवीन संगणक यंत्रणा खरेदी करणे आणि/किंवा सध्या उपलब्ध असलेल्या संगणक यंत्रणेत वाढ/ई-गव्हर्नन्स यंत्रणा इ. त्याची श्रेणीवाढ करण्यास मंजुरी देणे तसेच त्यासाठी आवश्यक असणारी वातानुकुलित यंत्रणेची मांडणी व देखभाल दुरुस्ती यासाठीचे प्रशासनिक विभागाला असलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२३११०२५४५७०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SARIKA UTTAM PATIL

Digitally signed by SARIKA UTTAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=aa374b566d78c73e42804a2013f949268134e97ca9f7b2458c4247baf4c72175, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6401C88A0E0E14D8299DD0F14BA71419FCC6EE4670C193CBF1EB58127FA5947D, cn=SARIKA UTTAM PATIL
Date: 2026.04.23 11:03:55 +05'30'

**( सारिका उ. पाटील )**
**कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९.मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०.सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११.मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३.महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई, नागपूर,
१४. प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१५. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

१६.संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१७.सहसचिव, वित्त विभाग (कार्या-व्यय-४),मंत्रालय, मुंबई
१८.उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२०.निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२१.लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२१. निवडनस्ती (मावज-१), सामान्य प्रशासन विभाग.